# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** सेवाप्रवेश नियम 2023 मधील "उपायुक्त" या पदावर पदोन्नतीकरिता

**{सामान्य प्रशासन विभाग}** असलेल्या अटीमध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग नामपा/1623/प्र.क्र.42/नवि-26, दि. 13 मार्च, 2024

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेच्या उपायुक्त पदावरील सेवाप्रवेश नियमाचे अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत नमुद आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : नामपा/1223/प्र.क्र.77/नवि-26, दि. 08/12/2023 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-ब (नागपूर शहर महानगरपालिका सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2023 ला मान्यता राजपत्र प्रसिद्धी दि. 08/12/2023 अन्वये "उपायुक्त" वेतनमान (सातवे वेतन आयोगानुसार वेतनमान रू. 67700-208700) सहावे वेतन आयोगानुसार रू. 15600-39100-ग्रेड पे 6600 या पदावर पदोन्नती देण्याबाबतची तरतुद करण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त या पदाची एकूण मंजूर पदे 07 असून, 3 पदे प्रतिनियुक्तीची आहेत. 04 पदे म.न.पा. संवर्गातील पदोन्नतीचे पद आहे. 07 मंजूर पदांपैकी 03 पदावर पदोन्नतीने अधिकारी कार्यरत असून, पदोन्नतीचे 01 पद रिक्त आहे.

सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी पात्रता खालीलप्रमाणे नमुद करण्यात आली आहे.

अ) उपायुक्त या रिक्त पदांपैकी आकृतीबंध मंजूर झाल्याच्या दिनांकापासून प्रथम 3 वर्षाकरिता 50 टक्के जागा हया सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी आणि 50 टक्के जागा हया महापालिका सचिव व सांख्यिकी अधिकारी या पदांमधून सेवाजेष्ठता व योग्यतेच्या आधारे भरण्याची तरतूद आहे.

ब) तसेच 3 वर्षानंतर हया पदोन्नतीच्या सर्व जागा (4 पदे) सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे, भरण्याची तरतूद आहे.

तसेच महापालिका सचिव व सांख्यिकी अधिकारी या पदावर सद्य:स्थितीत कोणीही अधिकारी कार्यरत नाहीत. करिता महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या संवर्गातून उपायुक्त या पदावर पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध नसल्याने पुढील 3 वर्षात पदोन्नतीकरीता काणतेही अधिकारी पात्र होवू शकणार नाही. करिता उपायुक्त पदावर पदोन्नतीसाठी सेवा प्रवेश नियमातील नमूद उक्त तरतूद ही आता न्यायोचित नसुन आता त्यास कोणतेही औचित्य राहिलेले नाही.

करिता, सेवा प्रवेश नियम 2023 मध्ये असलेली उक्त प्रमाणे नमुद अटी मधील "अ" नमुद अट वगळून "ब" मध्ये नमुद 3 वर्षानंतर ही बाब वगळून पदोन्नतीच्या सर्व जागा (4 पदे) सहा. आयुक्त/वार्ड

अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे, भरण्याची सुधारीत तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे.

**उपायुक्त पदावर पदोन्नतीसाठी सुधारीत तरतुद :-**

"उपायुक्त या पदावर पदोन्नतीच्या सर्व जागा सहायक आयुक्त / वार्ड अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे नेमणूक करणे"

उपायुक्त पदावरील सेवाप्रवेश नियमात वरीलप्रमाणे सुधारणा करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 73/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 02/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सेवाप्रवेश नियम 2023 मधील "उपायुक्त" या पदावर पदोन्नतीकरिता असलेल्या अटीमध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग नामपा/1623/प्र.क्र.42/नवि-26, दि. 13 मार्च, 2024

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेच्या उपायुक्त पदावरील सेवाप्रवेश नियमाचे अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत नमुद आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : नामपा/1223/प्र.क्र.77/नवि-26, दि. 08/12/2023 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-ब (नागपूर शहर महानगरपालिका सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2023 ला मान्यता राजपत्र प्रसिद्धी दि. 08/12/2023 अन्वये "उपायुक्त" वेतनमान (सातवे वेतन आयोगानुसार वेतनमान रू. 67700-208700) सहावे वेतन आयोगानुसार रू. 15600-39100-ग्रेड पे 6600 या पदावर पदोन्नती देण्याबाबतची तरतुद करण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त या पदाची एकूण मंजूर पदे 07 असून, 3 पदे प्रतिनियुक्तीची आहेत. 04 पदे म.न.पा. संवर्गातील पदोन्नतीचे पद आहे. 07 मंजूर पदांपैकी 03 पदावर पदोन्नतीने अधिकारी कार्यरत असून, पदोन्नतीचे 01 पद रिक्त आहे.

सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी पात्रता खालीलप्रमाणे नमुद करण्यात आली आहे.

अ) उपायुक्त या रिक्त पदांपैकी आकृतीबंध मंजूर झाल्याच्या दिनांकापासून प्रथम 3 वर्षाकरिता 50 टक्के जागा हया सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी आणि 50 टक्के जागा हया महापालिका सचिव व सांख्यिकी अधिकारी या पदांमधून सेवाजेष्ठता व योग्यतेच्या आधारे भरण्याची तरतूद आहे.

ब) तसेच 3 वर्षानंतर हया पदोन्नतीच्या सर्व जागा (4 पदे) सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे, भरण्याची तरतूद आहे.

तसेच महापालिका सचिव व सांख्यिकी अधिकारी या पदावर सद्य:स्थितीत कोणीही अधिकारी कार्यरत नाहीत. करिता महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या संवर्गातून उपायुक्त या पदावर पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध नसल्याने पुढील 3 वर्षात पदोन्नतीकरीता काणतेही अधिकारी पात्र होवू शकणार नाही. करिता उपायुक्त पदावर पदोन्नतीसाठी सेवा प्रवेश नियमातील नमूद उक्त तरतूद ही आता न्यायोचित नसुन आता त्यास कोणतेही औचित्य राहिलेले नाही.

करिता, सेवा प्रवेश नियम 2023 मध्ये असलेली उक्त प्रमाणे नमुद अटी मधील "अ" नमुद अट वगळून "ब" मध्ये नमुद 3 वर्षानंतर ही बाब वगळून पदोन्नतीच्या सर्व जागा (4 पदे) सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे, भरण्याची सुधारीत तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे.

**उपायुक्त पदावर पदोन्नतीसाठी सुधारीत तरतुद :-**

"उपायुक्त या पदावर पदोन्नतीच्या सर्व जागा सहायक आयुक्त / वार्ड अधिकारी, महापालिका सचिव आणि सांख्यिकी अधिकारी या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतून जेष्ठता व योग्यतेच्या आधारे नेमणूक करणे"

उपायुक्त पदावरील सेवाप्रवेश नियमात वरीलप्रमाणे सुधारणा करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.